# उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यातील सहसंबंधाचा अभ्यास

**डॉ. विजेंद्र श्रीकृष्ण पुराणिक**
**सहायक प्राध्यापक,**
**आर सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर**

***सारांश-***

*प्रस्तुत संशोधनात उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यातील सहसंबंधाचा अभ्यास सर्वेक्षण पद्धतीने केला आहे. शिरपूर तालुक्यातील उच्च माध्यमिक शाळेतील 50 कला शाखा व 50 विज्ञान शाखा व 50 वाणिज्य शाखा असे एकूण 150 विद्यार्थी सहेतुक नमुना निवड पद्धतीने निवडले होते. माहिती संकलनासाठी पुढील संशोधन साधनाचा वापर केला आहे स्वनिर्मित वेळचे व्यवस्थापन कौशल्य चाचणी व स्वनिर्मित सकारात्मक दृष्टीकोन मापिकेचा अवलंब केला होता. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसन चा 'r' मूल्य या परिमाणाचा वापर करण्यात आला आहे. उच्च माध्यमिक शाळांमधील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यात सार्थ सहसंबध असून तो धनात्मक व उच्च स्वरूपाचा आहे.*

**प्रस्तावना-**

विद्यमान काळात शिक्षण क्षेत्रात केवळ शैक्षणिक यशालाच महत्त्व न देता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाकडेही विशेष लक्ष दिले जात आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक यश, मानसिक स्वास्थ्य, सामाजिक समायोजन आणि भविष्यातील यश हे अनेक मानसशास्त्रीय व वर्तणुकीशी संबंधित घटकांवर अवलंबून असते. त्यामध्ये वेळचे व्यवस्थापन कौशल्य आणि सकारात्मक दृष्टीकोन हे दोन महत्त्वाचे घटक मानले जातात. वेळचे व्यवस्थापन कौशल्य- वेळ हे एक अमूल्य साधन असून एकदा गेलेली वेळ पुन्हा मिळवता येत नाही. त्यामुळे वेळेचा योग्य वापर करणे ही यशाची गुरुकिल्ली मानली जाते. वेळचे व्यवस्थापन कौशल्य म्हणजे उपलब्ध वेळेचे योग्य नियोजन करून उद्दिष्टपूर्ती साध्य करण्याची क्षमता होय. यामध्ये पुढील घटकांचा समावेश होतो-

- उद्दिष्ट निश्चिती
- कामांचे नियोजन व प्राधान्यक्रम ठरविणे
- वेळेचे योग्य वाटप
- विलंब टाळणे
- आत्मनियंत्रण

विद्यार्थ्यांच्या जीवनात वेळेचे व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. योग्य वेळ व्यवस्थापनामुळे विद्यार्थी अभ्यास, सहअभ्यासक्रमीय उपक्रम, विश्रांती व वैयक्तिक जीवन यामध्ये समतोल साधू शकतात. चांगले वेळ व्यवस्थापन कौशल्य असलेले विद्यार्थी ताणतणावमुक्त राहतात, आत्मविश्वासाने निर्णय घेतात आणि यशाकडे वाटचाल करतात.

सकारात्मक दृष्टीकोन- सकारात्मक दृष्टीकोन म्हणजे जीवनातील परिस्थितीकडे आशावादी, आत्मविश्वासपूर्ण व समाधानकारक दृष्टीने पाहण्याची मानसिक भूमिका होय. सकारात्मक दृष्टीकोन असलेली व्यक्ती अडचणींना संधी म्हणून पाहते आणि अपयशातून शिकण्याचा प्रयत्न करते. सकारात्मक दृष्टीकोनाचे काही महत्त्वाचे पैलू पुढीलप्रमाणे आहेत -

- आत्मविश्वास
- आशावाद
- भावनिक स्थैर्य
- समस्या सोडविण्याची तयारी
- जीवनाबद्दल सकारात्मक भावना

विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन असल्यास त्यांची शिकण्याची प्रेरणा वाढते, शैक्षणिक कामगिरी सुधारते आणि मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. तसेच ते सामाजिकदृष्ट्या अधिक समायोजित होतात.

वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यांतील संबंध

वेळचे व्यवस्थापन कौशल्य आणि सकारात्मक दृष्टीकोन यांचा परस्परसंबंध अतिशय जवळचा आहे. जे विद्यार्थी आपल्या वेळेचे योग्य नियोजन करतात, त्यांच्यात यशाची भावना निर्माण होते, आत्मविश्वास वाढतो आणि त्यामुळे त्यांचा दृष्टीकोन सकारात्मक बनतो. त्याचप्रमाणे सकारात्मक दृष्टीकोन असलेले विद्यार्थी अडचणींना न घाबरता वेळेचा योग्य वापर करण्याचा प्रयत्न करतात. कला, विज्ञान व वाणिज्य या तिन्ही शाखांतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासपद्धती, जबाबदाऱ्या आणि शैक्षणिक गरजा भिन्न असतात. त्यामुळे या शाखांतील विद्यार्थ्यांमध्ये वेळचे व्यवस्थापन कौशल्य आणि सकारात्मक दृष्टीकोन यांतील सहसंबंधाचा अभ्यास करणे शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचे ठरते. उच्च माध्यमिक स्तर हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या टप्प्यावर विद्यार्थी कला, विज्ञान व वाणिज्य अशा विविध शाखांमध्ये प्रवेश घेतात आणि त्यांच्यावर अभ्यासाचा ताण, परीक्षांचे दडपण, करिअरविषयक निर्णय, स्पर्धात्मक वातावरण इत्यादी अनेक जबाबदाऱ्या येतात. या सर्व परिस्थितींना सामोरे जाण्यासाठी

विद्यार्थ्यांकडे योग्य वेळेचे नियोजन करण्याची क्षमता आणि सकारात्मक दृष्टीकोन असणे अत्यावश्यक ठरते. वेळचे व्यवस्थापन कौशल्य हे विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन कामांचे नियोजन, प्राधान्यक्रम ठरविणे, अभ्यासासाठी योग्य वेळ देणे आणि ताणतणाव कमी करण्यास मदत करते. त्याचप्रमाणे सकारात्मक दृष्टीकोन विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, आशावाद, समस्या सोडविण्याची तयारी आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची प्रवृत्ती निर्माण करतो.

आजच्या स्पर्धात्मक युगात, विविध शाखांतील विद्यार्थ्यांमध्ये वेळेच्या व्यवस्थापनाची पातळी आणि त्यांच्या दृष्टिकोनातील सकारात्मकता यामध्ये फरक आढळून येतो. त्यामुळे या दोन्ही घटकांमधील परस्परसंबंधाचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधनात उच्च माध्यमिक शाळांमधील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य आणि सकारात्मक दृष्टीकोन यांतील सहसंबंधाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**समस्या विधान-** उच्च माध्यमिक शाळांमधील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे-**

१. उच्च माध्यमिक शाळांमधील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

१. उच्च माध्यमिक शाळांमधील कला शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यात सार्थ सहसंबंध दिसून येत नाही.

२. उच्च माध्यमिक शाळांमधील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यात सार्थ सहसंबंध दिसून येत नाही.

३. उच्च माध्यमिक शाळांमधील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यात सार्थ सहसंबंध दिसून येत नाही.

**संशोधनाची कार्य पद्धती-**

- **संशोधन पद्धती-** सर्वेक्षण पद्धती
- **न्यादर्श:** शिरपूर तालुक्यातील उच्च माध्यमिक शाळेतील 50 कला शाखा व 50 विज्ञान शाखा व 50 वाणिज्य शाखा असे एकूण 150 विद्यार्थी सहेतुक नमुना निवड पद्धतीने निवडले होते.

- **साधने (Tools):** माहिती संकलनासाठी पुढील संशोधन साधनाचा वापर केला आहे

1. स्वनिर्मित वेळचे व्यवस्थापन कौशल्य चाचणी - विधाने 30, पर्याय - सहमत, असहमत, सांगता येत नाही.
2. स्वनिर्मित सकारात्मक दृष्टीकोन मापिका - विधाने 30, पर्याय- सहमत, असहमत, सांगता येत नाही.

- **संख्याशास्त्रीय परिमाणे-** संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसन चा 'r' मूल्य या परिमाणाचा वापर करण्यात आला आहे.

**माहिती संकलन व विश्लेषण:**

1. **उच्च माध्यमिक शाळांमधील कला शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यात सार्थ सहसंबंध दिसून येत नाही.**

| कला शाखा | N | Table 'r' | Obtained 'r' |
|---|---|---|---|
| वेळचे व्यवस्थापन कौशल्य | 50 | .195 | .750 |
| सकारात्मक दृष्टीकोन | 50 | | |

स्वाधीनता मात्रा (df) 98 ला 0.05 स्तरावर सारणी 'r' मूल्य .195 आहे. प्राप्त r मूल्य .750 आहे. म्हणजेच प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. माध्यमिक शाळांमधील कला शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन सार्थ सहसंबंध दिसून येतो. हा सहसंबंध धनात्मक व उच्च आहे.

2. **उच्च माध्यमिक शाळांमधील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यात सार्थ सहसंबंध दिसून येत नाही.**

| विज्ञान शाखा | N | Table 'r' | Obtained 'r' |
|---|---|---|---|
| वेळचे व्यवस्थापन कौशल्य | 50 | .195 | .770 |
| सकारात्मक दृष्टीकोन | 50 | | |

स्वाधीनता मात्रा (df) 98 ला 0.05 स्तरावर सारणी 'r' मूल्य .195 आहे. प्राप्त r मूल्य .770 आहे. म्हणजेच प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. माध्यमिक शाळांमधील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन सार्थ सहसंबंध दिसून येतो. हा सहसंबंध धनात्मक व उच्च आहे.

3. **उच्च माध्यमिक शाळांमधील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यात सार्थ सहसंबंध दिसून येत नाही.**

| वाणिज्य शाखा | N | Table 'r' | Obtained 'r' |
|---|---|---|---|
| वेळचे व्यवस्थापन कौशल्य | 50 | .195 | .760 |
| सकारात्मक दृष्टीकोन | 50 | | |

स्वाधीनता मात्रा (df) 98 ला 0.05 स्तरावर सारणी 'r' मूल्य .195 आहे. प्राप्त r मूल्य .760आहे. म्हणजेच प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. माध्यमिक शाळांमधील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन सार्थ सहसंबंध दिसून येतो. हा सहसंबंध धनात्मक व उच्च आहे.

**निष्कर्ष**

१. उच्च माध्यमिक शाळांमधील कला शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यात सार्थ सहसंबंध आढळून येतो.
२. उच्च माध्यमिक शाळांमधील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यात सार्थ सहसंबंध आढळून येतो.
३. उच्च माध्यमिक शाळांमधील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य व सकारात्मक दृष्टीकोन यात सार्थ सहसंबंध आढळून येतो.

**निष्कर्षावर आधारीत चर्चा**

प्रस्तुत संशोधनात, कला शाखेतील विद्यार्थ्यांचे वेळचे व्यवस्थापन कौशल्य आणि सकारात्मक दृष्टीकोन यामध्ये धनात्मक व उच्च सहसंबंध आढळला आहे. म्हणजेच, कला शाखेतील विद्यार्थ्यांना जेव्हा वेळेचे योग्य व्यवस्थापन करण्याची क्षमता असते, तेव्हा त्यांचा सकारात्मक दृष्टीकोन देखील जास्त असतो. हे दर्शवते की, कला शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये एकूणच एक प्रकारची सुसंस्कृतता आणि एकाग्रता असू शकते, जी त्यांना त्यांचा दृष्टिकोन सकारात्मक ठेवण्यास मदत करते. कला शाखेतील विद्यार्थ्यांसाठी कला आणि सर्जनशीलतेची शिक्षण पद्धती कदाचित त्यांना चांगले वेळ व्यवस्थापन शिकविण्याच्या प्रक्रियेत मदत करते, ज्यामुळे त्यांचा दृष्टीकोन अधिक सकारात्मक बनतो. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये देखील वेळचे व्यवस्थापन कौशल्य आणि सकारात्मक दृष्टीकोन यामध्ये धनात्मक व उच्च सहसंबंध आढळला आहे. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये योग्य वेळ व्यवस्थापन कौशल्य विकासाच्या प्रक्रिया कदाचित त्यांच्या अभ्यासाची गती आणि तंत्रज्ञानातल्या आत्मविश्वासामुळे येतात, आणि त्यांचा दृष्टीकोन सकारात्मक असतो. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या संदर्भात देखील वेळचे व्यवस्थापन कौशल्य आणि सकारात्मक

दृष्टीकोन यामध्ये धनात्मक व उच्च सहसंबंध आढळला आहे. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांमध्ये चांगले वेळ व्यवस्थापन असणे महत्त्वाचे आहे, कारण त्यांना त्यांच्या अभ्यासासोबतच विविध इतर कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या देखील पार कराव्या लागतात. त्यामुळे, या विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक आणि चांगला असण्याची शक्यता असते. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी आर्थिक धोरणे, व्यवस्थापनाचे सिद्धांत आणि वेळेचे योग्य नियोजन यांचा संबंध जास्त असतो, आणि त्यामुळे त्यांचा दृष्टीकोन सकारात्मक होतो. आपण यावर विचार करू शकतो की, विद्यार्थी त्यांच्या वेळेचे व्यवस्थापन कसे सुधारू शकतात आणि त्याचा त्याच्या दृष्टीकोनावर कसा सकारात्मक परिणाम होईल? उदाहरणार्थ, वेळेचे योग्य नियोजन त्यांना ताण कमी करण्यास मदत करेल आणि ते मानसिकदृष्ट्या अधिक स्थिर असतील, ज्यामुळे त्यांच्या दृष्टिकोनात सकारात्मकता येईल. याशिवाय, या अभ्यासाच्या परिणामांचा शालेय शिक्षण प्रणालीवर कसा प्रभाव पडतो, याबद्दल देखील चर्चा होऊ शकते. शिक्षक व मार्गदर्शक कसे या सहसंबंधांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या विकासासाठी करू शकतात? हे निष्कर्ष महत्त्वाचे आहेत, कारण ते विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनाच्या आणि भविष्यातील यशाच्या दृष्टीने मार्गदर्शन करू शकतात.

## संदर्भग्रंथ सूची

Best & Kahn. (2006). Research in Education (9th Ed). Delhi: Prentice Hall of India.

Garrett, H .E. (2006). Statistics in Psychology & Education (1st Ed. Indian Reprint). Delhi: Sage Publication.

Kang, L. S., & Kaur, G. (2021). Contextual support and career aspirations of working women. *South Asian Journal of Human Resources Management*, *8*(1), 54-78.

Kumar, Ranjit. (2011). Research Methodology a step by step guide for beginners (3rd Ed). New Delhi: Sage Publication.

खान, फरीदा. (२०२५). *सॉफ्ट स्किल.* (प्रथम आवृत्ती) जळगाव: अथर्व पब्लिकेशन्स.